# आत्मनिर्भर कर्ज योजना नियमावली

१. कर्जाची कमाल मर्यादा रू. १०,००,०००/- राहिल.

२. कर्जावरील व्याजदर द.सा.द.शे. ९% राहिल.

३. कर्जाची परतफेड किमान ६ व कमाल १८० समान मासिक हप्त्यांत करता येईल.

४. रू.५,००,०००/- पर्यंतच्या कर्जअर्जासोबत रू. १००/- चा व त्यावरील कर्जासाठी रू. २००/- चा कर्ज करार दयावा लागेल. अर्जदाराची मागील ३ महिन्यांची वेतनपत्रके जोडावी लागतील.

५. कर्ज व व्याज परतफेडीनंतर सभासदाच्या हाती एकूण वेतनाच्या १/४ निव्वळ वेतन मिळेल इतकेच कर्ज मंजूर होईल.

६. अन्य पतसंस्थेचे सभासदत्व असल्यास त्या पतसंस्थेकडे कर्ज नसल्याचे प्रमाणपत्र जोडावे लागेल तसेच तेथे कर्ज असल्यास शिल्लक कर्जाचा दाखला दयावा लागेल. दाखल्यानुसार ते कर्ज वळते करून उर्वरीत रक्कम देण्यात येईल.

७. रू.७ लाखांपर्यंतच्या कर्जासाठी **१ जामिनदार** व रू.७ लाखांवरील कर्जासाठी **२ जामिनदार** आवश्यक राहतील. जामिनदार इतर ३ पेक्षा जास्त कर्ज प्रकरणांस जामिन नसावेत. तसेच कर्जदाराच्या सध्या चालू असलेल्या मध्यमुदत कर्जास ते जामीनदार नसावेत.

८. कर्ज अर्जासोबत जामीनदारांचे मागील एक महिन्याचे वेतनपत्रक जोडावे लागेल. प्रत्येक जामीनदाराच्या हाती एकूण वेतनाच्या ४०% निव्वळ वेतन येणे आवश्यक राहिल.

९. कर्ज घेतेवेळी जर तातडीचे कर्ज शिल्लक असेल तर ते वळते करून घेण्यात येईल.

१०. कर्जासाठी रू. २००/- इतका सर्व्हीस चार्ज आकारण्यात येईल.

११. सभासदांस सहकार खात्याने ठरवून दिलेल्या वेतनानुसारच्या कर्जसारणीनुसार लागू असणाऱ्या एकूण कर्जमर्यादेस अधिन राहून आत्मनिर्भर कर्ज दिले जाईल. एकूण कर्ज मर्यादेमध्ये पूर्वीचे शिल्लक मध्यमुदत कर्ज व आत्मनिर्भर कर्ज अंतर्भूत असेल.

१२. हे कर्ज घेतेवेळी कर्जदाराच्या नावे शिल्लक असलेले मध्यमुदत कर्ज व आत्मनिर्भर कर्ज असे मिळून एकूण कर्जाच्या रकमेच्या १०% इतके भाग भांडवल, तसेच पूर्वी कोणतेही कर्ज घेतलेले नसल्यास मृत्युंजय योजना मुद्दल खाती रू. ८,०००/- तसेच मृत्युंजय योजना व्याज खाती रू. ७,०००/- इतकी रक्कम पतसंस्थेत जमा असली पाहिजे. सदर रक्कम जमा नसल्यास / कमी जमा असल्यास आवश्यक ती रक्कम मंजुर कर्ज रकमेतून वसूल करण्यात येईल.

१३. आत्मनिर्भर कर्ज योजनेअंतर्गत कर्ज घेतल्यास सभासदाच्या नावे चालु असलेल्या मध्यमुदत कर्जाची किंवा सदर कर्जाची परतफेड ६ मासिक वेतन हप्ता कपातीनंतरच अंशतः अथवा पुर्णतः करता येईल. चालू मध्यमुदत कर्ज व आत्मनिर्भर कर्जाची व त्यांच्या व्याज रकमेची वसूली वेगवेगळी करण्यात येईल. आत्मनिर्भर कर्जाची वसूली प्रथमतः करण्यात येईल तसेच सभासदाच्या नावे असलेल्या कर्जाची अंशत ः किंवा पूर्ण परतफेड करावयाची असेल तेव्हा सर्वप्रथम तातडीचे कर्ज ,आत्मनिर्भर कर्ज,मध्यमुदत कर्ज या क्रमाने रक्कम जमा करून घेण्यात येईल.

१४. कर्ज घेतल्यानंतरच्या पुढील परतफेडीच्या काळात सभासदाने उर्वरीत कर्जापेक्षा जास्तीचे मध्यमुदत कर्ज घेतल्यास त्या मंजुर रकमेतुन उर्वरित आत्मनिर्भर कर्ज रक्कम वळते करावे किंवा नाही ते सभासदाने त्यावेळी स्पष्ट करावयाचे आहे.

१५. कर्जाची व व्याजाची वसुली सलग ३ हप्त्यांत न झाल्यास जामीनदारांच्या वेतनातुन वसुली करण्यात येईल.

१६. सभासदास एकाच महिन्यात २ कर्ज घेता येणार नाहीत. म्हणजेच आत्मनिर्भर मध्यमुदत कर्ज घेतल्यास त्याच महिन्यात सभासदास मध्यमुदत कर्ज घेता येणार नाही. मध्यमुदत कर्ज घेतल्यास त्याच महिन्यात आत्मनिर्भर कर्ज घेता येणार नाही.

**वरील सर्व नियम,अटी व शर्ती मी वाचले असून मला ते मान्य आहेत व त्यामुळे सदर कर्जाबाबत होणाऱ्या कार्यवाहीस मी बांधील आहे.**

**सही ः** ______________________

**सभासदाचे नाव ः श्री/श्रीमती** ________________________________